# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मे — २०१९

| १ | देवनार पोलीस ठाणे मुंबई | गु.र.क्र. १४९/१९,कलम ३०२,३९७,२०१,३४ भादवि |
|---|---|---|

**—:जबरी चोरी करण्याचे उददेशाने व खुन करणे :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—**दि. ०३/०५/१९ रोजी सकाळी ०६:२७ वाजण्याचे सुमारास रोजी देवनार पोलीस ठाणे हद्दीत डॉ. झाकीर हुसैन नगर, सार्वजनिक शौचालयाजवळ एक अनोळखी/बेवारस इसम वय अंदाजे ३० वर्षे यांचा कोणीतरी अज्ञात इसमाने डोक्यात दगड घालून खुन केला म्हणून फिर्यादी यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीस अनुसरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. दिलीप भगवान धुमाळ, वय ५७ वर्षे |
| **बळीत/मयत** | :— | |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | **१) शफिउल्ला अतिउल्ला कुरेशी उर्फ गुड्डू, वय २३ वर्षे,<br>२) नियाज अहमद निहाल चौधरी उर्फ गंजा, वय २० वर्षे, ०४/०५/२०१९** |
| **चोरीस गेलेली मालमत्ता.** | :— | ६००/— रूपये रोख व साधा मोबाईल फोन त्यात मोबाईल क्रमांक ०८१०८७९५९९८ |
| **हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता** | :— | ३१०/— रूपये रोख व ैछैन्ष् कंपनीचा साधा मोबाईल फोन |

**तपास कौशल्य** :— गुन्हा घडल्यानंतर पर्यवेक्षक अधिकारी सपोनि. सरोदे यांनी तात्काळ मृतदेह राजावाडी रूग्णालयास रवाना केला. ठाणे अंमलदार परि. पोउनि. देशमुख यांचे सोबत मपोउनि. चवरे, पोउनि. सुर्यवंशी यांना अपमृत्यू चौकशीसाठी रूग्णालयास तर सपोनि. वाघमारे, पोउनि. बाबर व पोउनि. चंदन व पथक यांना आरोपीचे शोधार्थ रवाना केले, त्याबाबत मा. वरिष्ठांना माहिती दिली.

- गुन्हा करणारे आरोपीतांबाबत कोणतीही माहिती नसतानां मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सरोदे, सपोनि. वाघमारे, पोउनि. बाबर यांनी घटनास्थळावरून काही संशयीत इसमांना ताब्यात घेतले, त्यात मिळालेल्या प्रत्येक्षदर्शी साक्षीदारास विश्वासात घेऊन बोलते केले व मिळालेल्या माहितीस अनुसरून आरोपीत नामे— १) शफिउल्ला अतिउल्ला कुरेशी उर्फ गुड्डू, वय २३ वर्षे व २) नियाज अहमद निहाल चौधरी उर्फ गंजा, वय २० वर्षे यांचा शोध घेऊन त्यांना गुन्हा घडल्यानंतर काही काळातच जेरबंद करण्यात आले.

- आरोपीत अटक झाली तरी गुन्हयातील मयत इसम कोण आहे ? याबाबत खुलासा झाला नव्हता. मयताचा चेहरा दगडाने ठेचल्यामुळे विद्रुप झाला होता, प्राथमिक तपासात त्याचे ओळख पटवणारे कोणतेही पुरावे मिळून आले नाही. आजु—बाजुच्या पोलीस ठाणेस मिसिंग तपासण्यात आले. गुप्त बातमीदारांना न्युज एजन्सीला माहिती देण्यात आली तरी मयत इसमाची ओळख पटत नव्हती.

- सर्व गोष्टीचा विचार केल्यानंतर शवविच्छेदनासाठी गेलेले पोउनि. सुर्यवंशी यांनी सपोनि. सरोदे यांना सांगितले की, मयताचे उजव्या हाताच्या अंगठयाजवळ 'ठज्ञ' व मनगटाच्या वर तळहाताच्या मागे 'भ्वसल ब्तवे' गोंधलेले दिसत होते. मयताची सुन्ता झालेले नव्हती. विशेष बाब म्हणजे मयताने दि. २७/०५/२०१९ रोजी झालेल्या

'सार्वजनिक लोकसभा निवडणूक– २०१९' मध्ये मतदान केलेले आहे.

- ➢ वर नमुद बाब गृहीत धरून सपोनि. सरोदे यांनी –

  १) मयत व्यक्तीने मतदान केले आहे.

  २) मयत व्यक्ती पायी घाटकोपर मानखुर्द लिंक रोडवर फिरत होता.

  ३) मयत व्यक्ती हा मुस्लिम नसावा कारण त्याची सुन्ता झालेली नाही.

  ४) मयत व्यक्ती च्या नावामध्ये 'ठज्ञ' अक्षरांचा समावेश असावा.

- ➢ या बाबी गृहीत धरून स्थानिक राजकीय पुढारी यांचे कडून शिवाजी नगर– मानखुर्द विधानसभा मतदार संघ क्र. १७१ च्या सर्व मतदान याद्या प्राप्त केल्या, नमुद याद्यामधून – स्त्रीया, मुस्लीम, वय वर्षे ४० पुढील पुरूष मतदार यांना वगळून विषेशत: ज्याचे नावात 'ठज्ञ' अक्षरांचा समावेश आहे अशा तरूण मतदारांची संशयीत म्हणून चाळणी करण्यात आली. मतदान याद्यांची चाळणी पुर्ण झाल्यानंतर गुन्हा देवनार पोलीस ठाणे हद्दीत घडलेला असल्याने देवनार व शिवाजीनगर परिसरात त्याबाबत मोठया प्रमाणात जाहीर अवाहन व चर्चा झालेली होती म्हणून ज्या भागात मराठी, ख्रिश्चिन व बौद्ध लोकसंख्या आहे अशा भागातुन संशयीतांची तपासणीस सुरवात करण्यात आली. त्यात पोउनि. चंदन व पथक मानखुर्द पोलीस ठाणे हद्दीत पीएमजीपी, साठे नगर परिसरात दिलेल्या याद्यातील संशयीत इसमांबाबत विचारणा करत असतांना पथकातील पोशिक्र. ०९९०७/शेलदरकर यांना तपासणी दरम्यान माहिती मिळाली की, पीएमजीपी कॉलनी, बिल्डींग नं. ९४ मधील इसम नामे– किरण वामन वानखेडे हा दि. ०२/०५/२०१९ रोजी रात्री पासुन बेपत्ता असुन त्याची मानखुर्द पोलीस ठाणेस हरवलेली व्यक्ती नोंद क्र. ६९/२०१९, दि. ०६/०५/२०१९ रोजी नोंद केलेली आहे. संशयीत मयत इसमाची आई कांताबाई वामन वानखेडे, वय ५० वर्षे यांचेकडून मृतदेहाची ओळख पटविण्यात आली व मृतदेह पुढील धार्मिक विधीसाठी त्याचे ताब्यात देण्यात आला.

- ➢ नमुद गुन्हयात अटक व पोलीस कोठडीतील आरोपीत नामे– १) शफिउल्ला अतिउल्ला कुरेशी उर्फ गुड्डू, वय २३ वर्षे याने केलेल्या निवेदनाप्रमाणे गुन्हयातील मालमत्ता 'काळे रंगाचे लेदरचे पाकिट त्यात ३१० रूपये रोख रक्कम (१००/– रूपये दराच्या ३ भारतीय चलनी नोटा व ५ रूपये दराचे २ नाणे) व मयत इसमाचे किरण वामन वानखेडे, वय ३० वर्षे यांचे नावाचे आधार कार्ड क्र. ८०३२३०१२४८७१, भारतीय निवडणूक ओळखपत्र क्र. ।र्थ्८५७४५६श रिकव्हरी पंचनामा करून जागीच सिलबंद करून ताब्यात घेण्यात आले.

- ➢ परंतु मयत इसमाचे आई नामे– कांताबाई वामन वानखेडे, वय ५० वर्षे यांनी दिलेल्या माहीतीप्रमाणे मयत व्यक्तीजवळ त्यांचा मोबाईल होता. तो मिळून येत नव्हता, नमुद मोबाईल क्रमांक ०८१०८७९५९९८ चा मा. पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ– ०६, मुंबई कडून ब्क्त प्राप्त करण्यात आला. त्याचे अवलोकन करून सपोनि. सरोदे व पोउनि. सुर्यवंशी व पथक यांनी तांत्रिक तपासांअंती साक्षीदारांचे जबाब नोंद करून गुन्हयातील अटक व पोलीस कोठडीतील आरोपीत नामे– नियाज अहमद निहाल चौधरी उर्फ गंजा, वय २० वर्षे यांचेकडून निवेदन व रिकव्हरी पंचनाम्याप्रमाणे मयत इसमाचा मोबाईल फोन शोधून काढला व ताब्यात घेतला. परंतु हस्तगत मोबाईलमध्ये मयताचे वापरते सीमकार्ड न मिळून आल्याने त्याबाबत आरोपीतास विचारणा करण्यात आली असता त्याने अटक होणार या भितीने मयत इसमाचा मोबाईल वापरल्यानंतर त्यातील सीमकार्ड वेगळे करून तोडून फेकुन दिल्याचे सांगितले. त्यामुळे आरोपीताने गुन्हयातील पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने हेतुपुरस्सर मयताचे मोबाईलमधील सीमकार्ड तोडून फेकुन दिले असल्याने नमुद गुन्हयात गुन्हा कलम २०१ भादविची वाढ करण्यात आली.

- वर नमुद केल्याप्रमाणे या गंभीर स्वरूपाचे गुन्हयात कोणताही पुरावा नसतांना यातील तपासी अधिकारी व इतर अधिकारी/अंमलदार यांनी प्रथमत: सांघिक काम करून प्रत्येक्षदर्शी साक्षीदार शोधून आढला व आरोपीस निष्पन्न केले. आरोपीतांना शिताफीने जेरबंद करून एकुण १४ दिवसाच्या पोलीस कोठडी दरम्यान गुन्हयाचा उद्देश (डवजपअम) स्पष्ट केला. मयत हा अनोळखी/बेवारस व्यक्ती असतांना चिकाटीने विशेष तपास कौशल्याचा वापर करत सुनियोजीत पद्धतीने उपलब्ध माहितीच्या आधारे मयताची ओळख पटविली. तसेच आरोपीतांकडून तपासादरम्यान गुन्हयातील जबरीने चोरी केलेली मालमत्ता हस्तगत केली. तसेच कमी कालावधीत नमुद गुन्हयाचा यशस्वी तपास केला.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे **मे–२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **देवनार पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | सपोनि | मोहन फ. सरोदे, |
| २ | पोउनि | विनायक पी. बाबर, |
| ३ | पोउनि. | प्रविण भा. सुर्यवंशी, |
| ४ | सफौ. | गंगाराम वा. मेघावले, |
| ५ | पोहक्र. ३२५१ | शंकर रामराव चव्हाण, |
| ६ | पोनाक्रं. ९६०१९६ | विनोद विश्वास म्हात्रे, |
| ७ | पोनाक्रं. ३३२२७ | सोमनाथ किसन गोसावी |
| ८ | पोशिक्रं. ०९०९०७ | सचिन ज्ञानोबा शेलदारकर |
| ९ | पोशिक्रं. ०६१४०६ | प्रमोद पांडूरंग ठाकूर |

✿✿✿✿✿✿✿

| ०२ | **भांडुप पो ठाणे** | **गु.र.क्र. कलम ६३७/२०१५ कलम ३०२, भादंवि** |
|---|---|---|

**—:खुनः—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत**:— गुन्हयातील मयत मुलगी नामे पायल राजेश सावंत, वय ६ वर्षे. राठी पंचरत्न सोसायटी, ३ रा माळा, जे एम रोड, सोनापुर, भांडुप (प), मुं ७८ हिला तिची सावत्र आई प्रतिभा सांवत वय २५ वर्षे हीने घरामध्ये कोणी नसताना तिला चटके देवुन तसेच शरीरावर ठिकठिकाणी कशाने तरी मारून, तिचा निरनिराळया प्रकारे शारिरिक छळ करून तिचा गळा आवळुन तिला जिवे ठार मारले अशी तक्रार सरकारतर्फे फिर्यादी नामे श्री. सुहास लहानु रहाणे वय ३२ वर्षे धदा नोकरी (पोउपनि) रा. ठी ६६/१९६३, पंतनगर पोलीस लाईन, घाटकोपर पु मुंबई यांनी दिली.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री.सुहास लहानु रहाणे,वय ३२ वर्षे |
| **बळीत/मयत** | :— | कुमारी पायल राजेश सावंत,वय ०६ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | प्रतिभा राजेश सावंत,वय २५ वर्षे, दिनांक ३०/११/२०१५ रोजी १७.४५ वा. |
| **निकाल दिनांक** | :— | १४/०५/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | मा. सत्र न्यायालय, कोर्ट रुम नं. ३९, मुंबई यांनी आरोपीस फौ.प्र. संहिता कलम २३५(२) अन्वये कलम ३०२ भादवि या कलमाखाली अपराध केला म्हणुन आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. |

- **तपास कौशल्य :—** भांडुप पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ३०/११/२०१५ रोजी पंचरत्न सोसायटी, ३ रा माळा, जे एम रोड, भांडुप पश्चिम मुंबई याठिकाणी श्री राजेश सावंत यांची मुलगी मयत झाल्याबाबत माहीती प्राप्त झाली होती. त्यानंतर मयत मुलीला मुलुंड जनरल रुग्णालयात पुढील उपचाराकरिता आणले व डॉक्टरांनी मयत झाल्याचे प्रमाणपत्र दिले. त्यानंतर ठाणे अंमलदार पो.उप.निरीक्षक सुहास राहाणे यांनी स्टॉफसह मुलुंड जनरल रुग्णालयात जावुन मयत मुलगी नामे पायल सावंत वय ६ वर्षे हिच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करुन अकस्मात मृत्यु क्र.१७२/१५ कलम १७४ फौ.प्र.संहिता अन्वये नोंद केली.

- मयत मुलीच्या शरीरावर नऊ वेगवेगळया ठिकाणी चटके दिल्याच्या, टोकदार वस्तुने डोळयामध्ये टोचल्याच्या जखमा आढळुन आल्या. त्यानंतर सदरचा मृतदेह हा शवविच्छेदनाकरीता राजावाडी रुग्णालयात पाठविण्यात आला. सदर मयत मुलीच्या शवविच्छेदनाच्या वेळी मुलीच्या डोळयात कोणतीतरी टोकदार वस्तु घातल्याने त्याचे इन्फेक्शन मेंदुपर्यंत गेल्याने तिचा मृत्यु झाला असल्याचे निष्पण्ण झाले.

- त्यानंतर मयत मुलीचे वडील व कुटुंबिय तिच्याबाबत काहीही माहीती देत नव्हते व मृत्युबाबत माहीती लपवुन ठेवत होते. कर्तव्यावरील दिवसपाळी पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर गोवे यांनी पोलीस उप निरीक्षक सुहास लहानु राहाणे यांची सरकारतर्फे तक्रार नोंद करुन गु.र.क्र. ६३७/१५ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला. त्यानंतर मयत मुलीचे चुलते नामे सुनिल सावंत यांच्याकडे तपास केला असता त्यांनी मुलीची सावत्र आई नामे प्रतिभा राजेश सावंत ही वारंवार मारहाण करीत असल्याचे सांगितले. मयत मुलीची सावत्र आई प्रतिभा सावंत हीला पोलीस ठाणेस आणुन तिच्याकडे गुन्हयाची चौकशी करुन तिनेच मयत मुलीस चटके देवुन, डोळयामध्ये सेफ्टी पिनने टोचुन घरात कोणीही नसताना क्रुरपणे ठार मारले असल्याचे कबुल केले.

- गुन्हा नोंदविल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री गोवे व पोउनि राहाणे यांनी गुन्हयातील मयत मुलीचे फोटोग्राफ काढून डेव्हलप केले. तसेच मुलीला मारण्यासाठी वापरलेला मुद्देमाल निवेदन पंचनामा करुन ताब्यात घेतला. घटनास्थळी भिंतीवर असलेले रक्ताचे नमुने ताब्यात घेवुन रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आले. तसेच गुन्हयाच्या अनुषंगाने एकुण १३ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले होते. गुन्हयाचा अतिशय सविस्तर, कौशल्यपुर्वक तपास करुन कोणतीही त्रुटी न ठेवता आरोपीविरोधात मा. न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले.

- नमुद गुन्हयामध्ये प्रथम तपासी अधिकारी पोउनि राहाणे स्वत: तपास करण्यासह फिर्यादी म्हणुन महत्त्वपुर्ण साक्ष सरकारतर्फे दिली. व द्वितीय तपासी अधिकारी पो.नि गोवे यांनी गुन्हयाची सुनावनीदरम्यान तयार केलेल्या पेपरप्रमाणेच साक्ष दिली.

- अपमृत्यु मधील महिला पंच व गुन्हयामधील निवेदन पंचनामा करण्यासाठी घेतलेल्या पंचांनी सील केलेला मुद्देमाल मा. न्यायालय ओळखला असुन तोच असल्याचे सांगितले. दोन्ही पंचनाम्यामधील पंचांनी पंचनाम्यातील वर्णनाप्रमाणे अचुक साक्ष दिली.

- सदरच्या गुन्हयामध्ये सर्वात प्रभावी साक्ष ही मयत मुलीची मोठी बहीण नामे मयुरी सावंत वय १३ वर्षे हिने आरोपीविरोधात दिली. मयुरी हिला कोर्ट कारकुन व शासकीय अभियोक्ता यांनी योग्य मार्गदर्शन करुन व्यवस्थित गुन्हयाची माहीती दिल्यामुळे तिने आरोपीविरोधात साक्ष दिली.

- मयत मुलीचे शवविच्छेदन केलेले मेडीकल ऑफीसर डॉ. श्री बी.जी. फाळके यांनीही आरोपीने अतिशय क्रुर पद्धतीने मयतास मारले असल्याबाबत साक्ष दिली आहे.

- तपासी अधिकारी यांनी आरोपीविरोधात सर्व पुरावे जमा करुन गुन्हयाचा योग्य प्रकारे तपास व कागदपत्रांची योग्य जुळणी करुन मा न्यायालयात विहीत वेळेत दोषारोप सादर केला. तसेच गुन्हयाची मा. न्यायालयात सुनावणी चालु असताना साक्षीदार व पंच यांना योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांना न्यायालयात हजर ठेवुन गुन्हयात पुरावा सिद्ध होईल याची काळजी घेण्यात आली व आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा लावण्याचे प्रयत्न करण्यात आले.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे **मे–२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **भांडूप पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | पो.नि. | सिद्धेश्वर गोवे |
| २ | पो.उ.नि. | सुहास राहाणे |
| ३ | पो.ह.क्र. २६५८९ | अनिल कदम |
| ४ | पो.ह.क्र.१६५७ | भरत सुर्यवंशी |
| ५ | पो.ह.क्र. २४९३० | सुर्यकांत मडव |
| ६ | पो.ह.क्र. २७४७६ | धनंजय पानकर |
| ७ | पो.शि.क्र. ०३.१०४७ | पांडुरंग भोये |
| ८ | म.पो.शि.क्र.०८.१११९ | सुवर्णा माने |
| ९ | | |

✪✪✪✪✪✪✪